RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक ८१(२)] बुधवार, जून ४, २०२५/ज्येष्ठ १४, शके १९४७ [पृष्ठे ६ , किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २०३**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ जून २०२५

**अधिसूचना**

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५.**

क्रमांक नियम-२०२५/प्र.क्र.६१/तांशि-४.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. २८) (यात यापुढे ज्याचा निर्देश, “उक्त अधिनियम” असा केला आहे) याच्या कलम ३ ची पोट-कलमे (१) व (२) तसेच कलम २ चा खंड (द) याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून काढलेली शासकीय अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. एईसी-२०२४/प्र.क्र.७०/तांशि-४, दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ (यात यापुढे जिचा निर्देश, “उक्त अधिसूचना” असा केला आहे) अन्वये, उक्त अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी व्यावसायिक पाठ्यक्रम असल्याचे यात विनिर्दिष्ट केलेले पूर्णवेळ व्यावसायिक शिक्षण पदवीपूर्व पाठ्यक्रम व व्यावसायिक शिक्षण पदव्युत्तर पदवी पाठ्यक्रम आणि त्यांच्या प्रवेशांच्या पात्रतेच्या शर्ती व आवश्यकता अधिसूचित केलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने, तिच्या मान्यता प्रक्रियेच्या हस्तपुस्तिका, २०२४-२७ द्वारे विवक्षित पदवीपूर्व व पदव्युत्तर तांत्रिक शिक्षण पाठ्यक्रमांच्या प्रवेशाच्या पात्रतेमध्ये केलेले फेरबदल विचारात घेता, अशा पाठ्यक्रमांकरिता, उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या पात्रतेच्या शर्तींमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भारतीय प्रौद्योगिकी संस्था (आय आय टी) मधील डिझाईन अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी असलेली राष्ट्रीय स्तरावरील पदवीपूर्व सामायिक प्रवेश परीक्षा (युसीईईडी) राज्यातील डिझाईन अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे;

आणि ज्याअर्थी, वास्तुशास्त्र परिषदेने, वास्तुशास्त्र परिषद (वास्तुशास्त्र पदव्युत्तर पदवी शिक्षण अभ्यासक्रमाची किमान मानके) मार्गदर्शक तत्त्वे, २०२२ तसेच परिषदेने त्यासंदर्भात वेळोवेळी काढलेल्या सर्व परिपत्रकांमधील वास्तुशास्त्र शिक्षण पदव्युत्तर पदवी पाठ्यक्रमाच्या किमान मानकांनुसार पात्रतेच्या शर्ती विनिर्दिष्ट करण्याच्या दृष्टीने, अशा पाठ्यक्रमांकरिता उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या पात्रता शर्तींमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ची पोट-कलमे (१) व (२) तसेच कलम २ चा खंड (द) यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उपरोक्त प्रयोजनांसाठी, उक्त अधिसूचनेत पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :-

१. उक्त अधिसूचनेस जोडलेल्या अनुसूची क मधील,-

(१) पदवीपूर्व पदवी अभिकल्प (बॅचलर ऑफ डिझाईन) पाठ्यक्रमाशी संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक १५ येथील नोंदीऐवजी, पुढील नोंद दाखल करण्यात येईल :-

| | | |
|---|---|---|
| "१५ | **संकल्प चित्रण पदवी अभ्यासक्रम (बॅचलर ऑफ डिझाईन) (४ वर्षे कालावधी)** | **(क) प्रथम वर्ष प्रवेश.-**<br>**(१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेले उमेदवार,-**<br>उमेदवार,-<br>(एक) भारतीय नागरिक असावा;<br>(दोन) १०+२ परीक्षा एकत्रित मिळून किमान पंचेचाळीस टक्के गुणांसह (महाराष्ट्र राज्यातील आरक्षित प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीतच केवळ, किमान चाळीस टक्के गुणांसह) उत्तीर्ण असावा आणि सक्षम प्राधिकरणाने आयोजित केलेल्या सीईटीमध्ये नॉन-झिरो प्राप्तांक मिळविलेला असावा; **किंवा**<br>(तीन) त्याच क्षेत्रातील किंवा संलग्न क्षेत्रातील शाखेतील डी. व्होक पाठयक्रम उत्तीर्ण असावा;<br>**(२) अखिल भारतीय उमेदवारी असलेले उमेदवार, जम्मू व काश्मीर संघराज्यक्षेत्र व लडाख संघराज्यक्षेत्र यांमधील स्थलांतरित उमेदवारी असलेले उमेदवार,-**<br>उमेदवार,-<br>(एक) भारतीय नागरिक असावा;<br>(दोन) १०+२ परीक्षा एकत्रित मिळून किमान पंचेचाळीस टक्के गुणांसह (महाराष्ट्र राज्यातील आरक्षित प्रवर्गांच्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आणि दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीतच केवळ, किमान चाळीस टक्के गुणांसह) उत्तीर्ण असावा आणि भारतीय प्रौद्योगिकी संस्था (आय आय टी) द्वारे आयोजित केलेल्या डिझाइन साठीची पदवीधर सामान्य प्रवेश परीक्षा (युसीईईडी) मध्ये नॉन झिरो पॉझिटीव्ह प्राप्तांक मिळविला असावा किंवा सक्षम प्राधिकरणाने आयोजित केलेल्या सीईटीमध्ये नॉन झिरो प्राप्तांक मिळविलेला असावाः<br>परंतु, डिझाइन साठीची पदवीधर सामान्य प्रवेश परीक्षा (युसीईईडी) मध्ये पॉझिटीव्ह प्राप्तांक मिळविलेल्या उमेदवाराला, सीईटीमध्ये नॉनझिरो प्राप्तांक मिळविलेल्या उमेदवारांपेक्षा प्राधान्य देण्यात येईल;<br>**किंवा**<br>(तीन) उमेदवार त्याच क्षेत्रातील किंवा संलग्न क्षेत्रातील शाखेतील डी. व्होक पाठ्यक्रम उत्तीर्ण असावा;<br>**(३) अनिवासी भारतीय किंवा भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती किंवा भारतीय वंशाच्या व्यक्ती, आखाती देशांतील भारतीय कामगारांची मुले, विदेशी नागरिक उमेदवारी असलेले उमेदवार.-**<br>(एक) उमेदवार, १०+२ परीक्षा एकत्रित मिळून किमान पंचेचाळीस टक्के गुणांसह उत्तीर्ण असावा; आणि<br>(दोन) अधिनियमान्वये व्याख्या केल्याप्रमाणे, समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी घोषित केलेले अन्य कोणतेही पात्रता निकष व आवश्यकता." |

(२) अनुक्रमांक २१ येथील नोंदीनंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :-

| | | |
|---|---|---|
| "२२ | **सहयोगी / जुळ्या (ट्वीनिंग) पद्धतीद्वारे पदवीपूर्व / दुहेरी पदवी / एकात्मिक अभ्यासक्रम** | (एक) सहयोगी / जुळ्या (ट्वीनिंग) पद्धतीने पदवीपूर्व / दुहेरी पदवी / एकात्मिक अभ्यासक्रमांच्या पहिल्या वर्षाच्या प्रवेशासाठी पात्रता संबंधित व्यावसायिक पदवीपूर्व / दुहेरी पदवी / एकात्मिक अभ्यासक्रमांच्या पहिल्या वर्षाच्या प्रवेश पात्रतेसारखीच असेल आणि ती योग्य प्राधिकरणाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या अतिरिक्त निकषांनुसार असेल.<br>(दोन) परदेशी सहयोग आणि जुळ्या (ट्वीनिंग) अभ्यासक्रमास पार्श्विक प्रवेश आणि अधिसंख्य जागा यांना परवानगी दिली जाणार नाही." |

२. उक्त अधिसूचनेस जोडलेल्या अनुसूची ख मधील,-

(१) वास्तुशास्त्र (एम. आर्किटेक्चर) (२ वर्ष कालावधी) संबंधित अनुक्रमांक ७ मधील नोंदीमध्ये, स्तंभ (३) मध्ये, "(१) महाराष्ट्र उमेदवारी उमेदवार आणि अखिल भारतीय उमेदवारी उमेदवार" या मथळ्यामध्ये, खंड (तीन) साठी, खालील खंड बदली दाखल करण्यात येईल.

"(तीन) उमेदवाराने वास्तुशास्त्र परिषद यांनी आयोजित केलेल्या आर्किटेक्चरमधील पदव्युत्तर पदवी प्रवेश परीक्षेत (पीजीईटीए) शून्यापेक्षा अधिक गुण मिळवलेले असावेत;".

(२) कार्यरत व्यावसायिकाकरिता असणाऱ्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंबंधी असलेल्या अनुक्रमांक १० येथील नोंदीनंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :-

| | | |
|---|---|---|
| "११ | **सहयोगी / जुळ्या (ट्वीनिंग) पद्धतीद्वारे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम** | (एक) सहयोगी / जुळ्या (ट्वीनिंग) पद्धतीने पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या पहिल्या वर्षाच्या प्रवेशासाठी पात्रता संबंधित व्यावसायिक पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या पहिल्या वर्षाच्या प्रवेश पात्रतेसारखीच असेल आणि ती योग्य प्राधिकरणाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या अतिरिक्त निकषांनुसार असेल.<br>(दोन) परदेशी सहयोग आणि जुळ्या (ट्वीनिंग) अभ्यासक्रमास पार्श्विक प्रवेश आणि अधिसंख्य जागा यांना परवानगी दिली जाणार नाही." |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संतोष पु. खोरगडे,**
शासनाचे सहसचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated 4th June 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF ADMISSIONS AND FEES) ACT, 2015.

No. Niyam-2025/C.R.61/TE-4.— Whereas, the Government of Maharashtra has, *vide* Government Notification, Higher and Technical Education Department, No.AEC-2024/C.R.70/TE-4, dated the 14th February 2025 (hereinafter referred to as "the said notification"), in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 3 read with clause (*r*) of section 2 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015 (Mah. XXVIII of 2015) (hereinafter referred to as "the said Act"), notified the Professional Education Under Graduate Courses and Professional Education Post Graduate Courses mentioned in the Schedules appended thereto to be the Full Time Professional Education for the purposes of the said Act, and specified the eligibility conditions and requirements for admissions thereto;

And whereas, in view of the modifications in the eligibility for admission to certain under graduate and postgraduate technical education courses by the All India Council for Technical Education *vide* its Approval Process Handbook, 2024-27, it is expedient to amend eligibility conditions specified in the said notification for such courses;

And whereas, the Government of Maharashtra has decided to apply the National level Under graduate Common Entrance Examination for Design (UCEED), applicable for admission to Design Courses in Indian Institute of Technology (IIT), for admission to Design Courses in the State;

And whereas, in order to specify eligibility conditions as per the minimum standards of post graduate Architectural education courses specified by the Council of Architecture *vide* the Council of Architecture (Minimum Standards of Architectural Education for Post-Graduation Programme) Guidelines, 2022 and all circulars issued by the said council, from time to time, in this behalf ; it is expedient to amend the eligibility conditions specified in the said notification for such courses.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 3 read with clause (*r*) of section 2 of the said Act, the Government of Maharashtra hereby amends the said Notification, for the aforesaid purposes, as follows, namely :—

1. In **Schedule - A** appended to the said notification,-

(1) For entry at serial No.15, relating to Undergraduate Course in Design (Bachelor of Design), the following entry shall be substituted, namely :—

| | | |
|---|---|---|
| "15 | **Under Graduate Course in Design**<br><br>**(Bachelor of Design)**<br><br>**(4 Years duration)** | **(A) First Year Admission.—**<br><br>**(1) Maharashtra State Candidature Candidates.-**<br><br>The candidate,—<br><br>(i) Should be a citizen of India ;<br><br>(ii) Should have passed 10+2 examination and obtained atleast forty five per cent. marks in aggregate (atleast forty per cent. marks in aggregate in case of Reserved Categories, Economically Weaker Section and Persons with Disability category belonging to the Maharashtra State) and obtained non-zero score in CET conducted by the Competent Authority ; or<br><br>(iii) Should have Passed D. Voc. Stream in the same or allied sector ;<br><br>**(2) All India Candidature Candidates, Union Territory of Jammu and Kashmir and Union Territory of Ladakh Migrant Candidature Candidates.—**<br><br>The candidate,—<br><br>(i) Should be a citizen of India ;<br><br>(ii) Should have passed 10+2 examination and obtained atleast forty five per cent. marks in aggregate (atleast forty per cent. marks in aggregate in case of Reserved Categories, Economically Weaker Section and Persons with Disability category belonging to the Maharashtra State) and obtained non-zero positive score in Undergraduate Common Entrance Examination for Design (UCEED) examination conducted by Indian Institute of Technology (IIT) or the candidate should have appeared in all the subjects in CET and obtained non-zero score in CET conducted by the Competent Authority :<br><br>Provided that preference shall be given to the candidate obtaining non-zero positive score in UCEED over the candidates who obtained non-zero score in CET ; or<br><br>(iii) Should have Passed D. Voc. Stream in the same or allied sector;<br><br>**(3) Non Resident Indian (NRI) or Overseas Citizen of India (OCI) or Person of Indian Origin (PIO), Children of Indian workers in the Gulf countries, Foreign National Candidature Candidates.-**<br><br>(i) The candidate should have passed 10+2 examination with atleast forty five per cent. marks in aggregate; and<br><br>(ii) Any other eligibility criteria and requirement declared from time to time by the appropriate authority, as defined under the Act." |

(2) After entry at Sr. No.21, the following entry shall be added, namely,—

| | | |
|---|---|---|
| **"22** | **Under Graduate/ Dual Degree/ Integrated Courses through collaborative / twinning mode** | (i) Eligibility for admission to First Year of Under Graduate / Dual Degree / Integrated Courses through collaborative / twinning mode shall be same as admission to first year of respective professional Under Graduate / Dual Degree / Integrated Courses and it is as per the additional norms if any, prescribed from time to time by the Appropriate Authority.<br>(ii) Lateral Entry and supernumerary seats shall not be allowed in Foreign Collaboration and Twinning Programme.". |

2. In **Schedule - B** appended to the said notification,—

(1) In entry at Sr. No. 7 relating to Architecture (M. Arch.) (2 years duration), in column (3), under the heading "(1) Maharashtra Candidature Candidate and All India Candidature Candidates", for clause (iii), the following clause shall be substituted, namely :—

"(iii) The candidate should have obtained non-zero score in the Post-Graduate Entrance Test in Architecture (PGETA) conducted by the Council of Architecture ;".

(2) After the entry at Sr. No. 10, relating to the admission to the courses for working professionals the following entry shall be added, namely,—

| | | |
|---|---|---|
| **"11** | **Post Graduate Courses through collaborative / twinning mode** | (i) Eligibility for admission to First Year of Post Graduate Courses through collaborative / twinning mode shall be same as admission to first year of respective professional Post Graduate Courses and it is as per the additional norms if any prescribed, from time to time by the Appropriate Authority.<br>(ii) Lateral Entry and supernumerary seats shall not be allowed in Foreign Collaboration and Twinning Programme.". |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANTOSH P. KHORGADE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.